असा. क्र. ६०

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, डिसेंबर २४, २००४ / पौष ३, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ट क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. | ५०६—५०८ |

दिनांक २४ डिसेंबर २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक २४ डिसेंबर २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५९ चा मुंबई ३६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि

२००४ चा महा. अध्या. ३१. म्हणून, त्यांनी २८ सप्टेंबर २००४ रोजी मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला होता;



[**किंमत :** रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २८ सप्टेंबर २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**२.** मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ (यात यापुढे ज्याचा निर्देश ' मुख्य अधिनियम ' असा करण्यात आला आहे), याच्या कलम ७ मध्ये,— १९५९ चा मुंबई ३६.

(क) पोट-कलम (१) मध्ये " मागणी केलेली " या मजकुरानंतर " किंवा आक्षेप घेतलेली " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक व **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेथे राज्य शासन हे, संपादन करणारा निकाय असेल तेथे, ते अशा अपिलांमध्ये फी प्रदानासाठी जबाबदार असणार नाही.

**स्पष्टीकरण**.— या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, " रक्कम " याचा अर्थ, विवादातील रक्कम असा आहे आणि यामध्ये सांविधिक लाभांच्या रकमेचा अंतर्भाव करण्यात येणार नाही.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या अनुसूची दोनची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या अनुसूची दोन मध्ये,—

(क) अनुच्छेद ३८अ मधील, खंड (क) च्या स्तंभ (१) मध्ये " दोन किंवा तीन " या मजकुराऐवजी " दोन, तीन किंवा चार " असा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) अनुच्छेद ३८फ मधील, स्तंभ (१) मध्ये " केलेला अर्ज किंवा निर्देश " या मजकुराऐवजी " केलेली तक्रार आणि अपील " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२००४ चा महा. अध्या. ३१.

**४.** (१) मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारित केलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारित केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट, किंवा, यथास्थिति कार्यवाही, असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ११० रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, डिसेंबर २४, २००४/पौष ३, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Court-fees (Amendment) Act-2004 (Mah. Act. No. XXII of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XXII OF 2004.

*(First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette " on the 24th December 2004).*

---

An Act further to amend the Bombay Court-fees Act, 1959.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

Bom XXXVI of 1959 Mah Ord. XXXI of 2004.

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to ammend the Bombay Court-fees Act, 1959, for the purposes hereinafter appearing, and therefore, promulgated the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2004, on the 28th September 2004 ;

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance, by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty- fifth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Bombay Court-fees (Amendment) Act, 2004.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 28th September 2004.

Amendment of section 7 of Bom. XXXVI of 1959.

2. In section 7 of the Bombay Court -fees Act 1959 (hereinafteer referred to as " the Principal Act "),— Bom. XXXVI of 1959.

(*a*) In sub-section (*1*), after the word " Claimed " the words " or challenged " shall be inserted ;

(*b*) to sub-section (*1*), the following proviso and Explanation shall be added, namely

"Provided that, where the State Goverment is and acquiring body, it shall not be liable for payment of fee in such appeals.

Explanation.— For the purposes of this sub-section, " amount " means the amount in dispute and it shall not include the amount of statutory benefits."

Amendment of Schedule II of Bom. XXXVI of 1959.

3. In Schedule II to the Principal Act,—

(*a*) in article 38A, in clause (c), in column(*1*) for the letters and word "II or III" the letters and word " II, III or IV " shall be substituted ;

(*b*) in article 38F, in column (*1*), for the word " Application or reference" the words "Complaint and Appeal " shall be substituted.

Repeal of Mah. Ord. XXXI of 2004 and saving.

4. (*1*) The Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2004, is hereby repealed. Mah. Ord. XXXI of 2004.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the Principal Act, as amended by the said, Ordinance, shall be deemed to have been done, or taken, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई